# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **24/11/2022**

**Brief of the work done :-**

सराईत दुचाकीचोर जेरबंद, 3 दुचाक्या जप्त ; पो.स्टे. कारंजा शहर पोलिसांची कारवाई.

## सराईत दुचाकीचोर जेरबंद

### तीन दुचाकी जप्त

**वाशीम**, दि. २३ (प्रतिनिधी)

शहर गुन्हे शोध पथकाने तीन सराईत दुचाकी चोरट्यांना जेरबंद करुन एक लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. पुसद येथील धम्मनगर श्रीरामपूर कॉलनी परिसरातील रवि संतोष शिंगारे व दिग्रस येथील सयद रफीक सयद सलाउद्दीन, सयद नजमोद्दीन उर्फ कालू अशी गजाआड केलेल्या चोरट्यांची नावे आहेत.



पोलीस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, शहरातील आययुडीपी परिसरातून मयुर हुमने यांची एम.एच.३० एजी-२१०३ या क्रमांकाची दुचाकी चोरीला गेल्याच्या तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करुन प्रकरण तपासात घेतले.दरम्यान, श्रीरामपूर वसाहत पूसद येथील रवी शिंगारे याच्याकडे सदर दुचाकी असल्याची माहिती गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार त्याला ताब्यात घेवून घराची झाडाझाडती घेतली असता चोरीच्या दोन दुचाकी आढळून आल्या. दरम्यान, पोलीस चौकशीत त्याने सदर साथीदार सय्यद रफीक सयद सलाउद्दीन याच्यासह दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली.चोरीची एक दुचाकी सयद नजमोद्दीन उर्फ कालू याला विकल्याची माहिती दिली. शिवाय १ लाख २० हजार रुपये किंमतीची २८ कट्टे हळद दिग्रस तालुक्यातील डेहणी येथून चोरी केल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी तीन दुचाकी जप्त करत तिघांना गजाआड केले. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पुजारी यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार रफीक शेख यांच्या नेतृत्त्वात डिबी पथकाचे एपीआय रमाकांत खंदारे, लालमणी श्रीवास्तव, रामकृष्ण नागरे, ज्ञानदेव नागरे, विठ्ठल महाले, संदीप वाकुडकर या पथकाने केली.